International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.10 No.2 Nov-Dec 2022

# खानदेशातील भिल्ल समस्या

**बाबासाहेब दुधभाते**
इतिहास विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
**Corresponding Author- बाबासाहेब दुधभाते**
**DOI-10.5281/zenodo.12772631**

**गोषवारा**

खानदेशच्या भौगोलिक वैशिष्टयापैकी भिल्ल समस्या ही एक समस्या आहे. खानदेशाच्या पूर्वीला आणि अग्नियेला सीमा लांबच्या लांब डोंगर रांगांनी व्यापली आहे. खानदेश हा पठारी भाग असून खोऱ्यांनी व्यापला आहे. टेकडया, अरण्ये, मैदानी प्रदेश, नापीक मैदानी क्षेत्र, उताराच्या लहान लहान टेकड्या अशी विविधता खानदेशात आढळून येते. खानदेशाच्या मध्यभागी तापीचे सुपीक खोरे आहे. तापीच्या मध्यवर्ती मैदानी प्रदेश बुऱ्हाणपूर ते नंदुरबार पर्यंत पसरला असून त्यांची लांबी २८८ कि. मी. आहे. तापीच्या उत्तरेस सातपुडा पर्वत आहे. या पर्वताची दक्षिण बाजू अतिशय तीव्र उताराची आहे. तापी खोऱ्याला समांतर असा पूर्व पश्चिम हा पर्वत वसला आहे. या भोगात दाट जंगले आणि डोंगराळ भागात अकणी, अक्कलकुवा, तळोदा तालुक्यांचा उत्तर भागाचा समावेश होतो. दाट जंगले आणि डोंगराळ प्रदेश यामुळे दळणवळणाच्या सोयीपासून वंचित आहे. भागात प्रामुख्यांने भिल्ल आदिवासी लोक वस्ती आहे?

**प्रस्तावना**

मध्ययुगीन काळातील खानदेशातील भिल्ल ही प्रशासनासाठी खूप मोठी डोकेदुःखी होऊन बसली होती. मुग्रल कालखंडातील ही समस्या असल्याचे अनेक दाखले मुघल दरबाराची बातमी पत्रे यात आहेत. मुघल बादशाह शाहाजहान व औरंगजेबाच्या काळात मुहमंद ताहिर यांच्या अर्जावरून कळते की त्यांची नियुक्ती कशासाठी बागलणांत केली आहे. बागलणात जंग्या भिल्ल शांत झाला नाही तो आजही जंगलात फिरत आहे. तरी त्यांला तंबी देऊन त्यावर नजर ठेवावी व छापा मारून पकडावे व त्यास नेस्तनाबूद करावे त्यामुळे बागलणवर परीणाम होईल हा आदेश इ.स. १६९० चा आहे. यावरून हेच समजून येते की मुघल काळात पण खानदेशात भिल्लांचा उपद्राव होता त्यासाठी काही ठोस योजना केलेल्या दिसत नाहीत मुघल कालखंडाप्रमाणेच मराठे काळातही खानदेशांत भिल्लांचा उपद्रव कमी झाला नाही. यासाठी पेशव्यांना वेगवेगळे उपाय करावे लागले. भिल्लांच्या उपद्रवासदंर्भात खानदेशातील कमावीलदार पेशव्यांना सतत पत्रे पाठवित असल्याचे सनिका व चिटणीसीदप्तरांतून दिसून येते. खानदेशात सातमाळ व सातपुडा यांच्या दरम्यान पसरलेला खानदेश त्यांस भिल्ल लोक त्रास देत त्यांचा बंदोबस्त करण्यासाठी सरकारातून फैज पाठवून देत असे पण भिल्ल हे लहान सहान प्रतिकारांस मुळीच दार देत नसत. खानदेशात चाळीसगांव, शेर्दुर्णी, बाजूस भिल्लांचा उपद्रव झाला होता. तसेच रोवर, अशेर, सावदे, चोपडे इत्यादी ठिकाणाचे जमीनदार कोळी व भिल्ल एक मताने एकत्र येऊन गावगल्ला माळ जाळून सरकारची नुकसानी करीत होते तरी या सर्वांची वतने जप्त करून वतनांची कमाविसी माधवराव विश्वास (१७५४-१७५५) यांस सांगण्यात आली. भिल्ल पुन्हा शरण आले की त्यांच्याकडून मान्य करून घेतले जात?

खानदेशात भिल्लांना काही हक्क होते जो पेशवा थोरल्या बाजीरावाच्या कारकीर्दीपासून चालत आला होतो. तो चालविण्यासंबंधीचा आदेश पेशव्यांनी खानदेशातील धुळे, भडगाव, बहाल, उन्नाण, मेहूणबारे, चाळीसगांव इत्यादी परगाण्याच्या जमिनदारांना पाठविण्यात आला होता. वरील परगाव्यातील गावांमधून दर राऊतांकडून, एक डोले, ऊस असणाऱ्या शेतकऱ्यांकडून गुळाची ढेप, प्रत्येक गावातून एक रूपया, एक बकरे, चांभाराकडून एक पप्पल जोड व पासोडी प्रत्येकी एक याप्रमाणे चालत असे. खानदेशातील भिल्लांकडून रयतेस लूटमारीचा वारंवार उपद्रव होई. त्यासाठी रयतेचे रक्षण करण्याची जबाबदारी भिल्लांवर सोपवून त्यांनी जागल करावी असा करार थोरल्या बाजीरावांशी केला होता. तसेच खानदेशातील भिल्लांना चोपडा, अडावद, रावेर इत्यादी महालातील जकातीच्या चौथा हिस्सा व-सूलीचा हक्क दिला होता. परंतु पेशवे नानासाहेब यांच्या कारकीर्दीत इ.स.

१७५४-५५ या वर्षी तो हक्क जप्त करण्यात आला आणि तो जमीनदारांकडे सोपविण्यात आला होता. ४ खानदेशाला दुष्काळ आणि भिल्लांचा तडाखा नेहमीच बसत असे यामुळे गावी ओस पडत असत. रयत परगंदा होऊन तो मुलुख ओस पडत असे. बाळाजी बाजीराव यांच्या कारकीर्दीत बिज्यागड सरकारमधील नेमाड प्रांत भिल्लांच्या

उपद्रवामुळे नासधूस होऊन अनेक वर्षे उजाड झाला तेव्हा सरकारी आदेशानुसार या मुलुखात नव्याने लागवड करण्याविषयाची नोंद पेशवा डायरीत मिळते. माधवराव पेशवे यांनी खानदेशाच्या सरसुभेदार यांनी भिल्लांचा दंगा होत असल्याचे कळविल्यावर चितामण हरी यांस १०० राऊत रोजमुल्यावर आखीर सालापर्यंत ठेवावे व त्यांचा जो खर्च पडेल तो लिहणे. किल्ले कुडमुंढे येथील दिल्या भिल्ल यांने किल्यांचा डोगरी भागातील पाच गांव जाळले व गावे उजाड केली. त्यामुळे त्यांची घरे व माणसे कृष्णाजी विश्वनाथ कामाविसदार यांनी जप्त करावी असा आदेश पेशवे माधवराव १७६९-१९७० मध्ये देतात.

भामेर परगाठ्यात भिल्लांचा दंगा झाला आहे त्यांच्या बंदोबस्ताकरीता शिबंदी ठेवने अशा प्रकारचे पत्र विसाजी हरी कमाविसदार भामरे यांस पेशव्यांनी कळविले होते. पेशव्याचे खानदेशातील भिल्ल दंग्यांची दखल घेतली जात होती. पण दंगे थांबत नाहीत हेच यातून दिसून येते. भिल्लांचा बंदोबस्त करण्यासाठी पेशवे सरकारने भिल्ल उपद्रव असणाऱ्या परगण्यातून भिल्लपटट्टी वसूल करण्याचे आदेश देण्यात आले होते. खानदेशातील एकूण परगण्यातील तारखा (५,१९,१५३१०१११) एकूण पाच लक्ष एकोणीस हजार एकशे सव्वात्रेप्पन रूपये पाऊण आणा इतका जमा होत असे. याशिवाय भिल्लपटट्टीचा ऐवज दरसरे रूपये ५ पांच प्रमाणे २५९५७११ (पंचवीस हजार नऊशे साडेसत्तावन रूपये) घ्यावयाचा करार केला होता. ही समद सरसुभा नारे कृष्ण यांना पाठविण्यात आली आहे. ही पटट्टी परगण्यांचे देशमुख, देशपांडे वसूल करून सरसुभा यांच्याकडे जमा करीत.

अशा प्रकारे मुघल काळापासून ते खानदेशातील ब्रिटीश अमलापर्यंत भिल्लांची दंगा सुरूच होता.

**संदर्भ सूचीः**


१. निकुंभे सी.एच., खानदेशातील आदिवासी जीवन व विकास अप्रकाशित एम. फिल लघुशोध प्रबंध, पुणे विद्यापीठ, पुणे. (१९८८) पृ. ६,८.

२. ग. ह. खरे, ऐतिहासिक फारशी साहित्य खंड-२ त्रैमासिक, भारत इतिहास संशोधक मंडळ पुणे, १९३० पृ. १०.

३. भावे वा. कृ. पेशवेकालीन महाराष्ट्र- वरदा प्रकाशन पुणे- २०१०. पृ. १०

४. भावे वा. कृ. पूर्वीक्त पृ. ४११.

५. महाजन टी. टी. खानदेशचा राजकीय व सांस्कृतीक इतिहास. कॉन्टिनेंन्टल प्रकाशन, पुणे १९९८.

६. एस. ए. पाटील. मराठयांच्या आमदानातील महाराष्ट्रातील दुष्काळाचा इतिहास (१६३०-१८१८) अप्रकाशित पी. एच. डी प्रबंध, पुणे विद्यापीठ, १९८२ पृ. २२६.

७. वाड ग.चि थोरले माधवराव पेशवे, डेक्कन न्हव्हत्याक्युलर ट्रान्सलेशन, सोसायटी पुणे १९११ पृ. ३०२.

८. कित्ता पृ. ३०२.

९. कित्ता पृ. ३०४.

१०. वाड. ग. चि सवाई माधवराव पेशवे वाड डायरी क. ६. पृ. १७२.